शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७
ई मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com वेब साईट क्रमांक www.dydepune.com

# सन २०१६-१७ इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया

## प्रसिध्दी निवेदन

## दिनांक १७/०५/२०१६

इनहाऊस/अल्पसंख्याक/व्यवस्थापन या कोटयातील प्रवेश कनिष्ठ महाविदयालय स्तरावर होतील संबंधित कनिष्ठ महाविदयालयाच्या शाखा व माध्यमनिहाय एकूण प्रवेश क्षमतेच्या इनहाऊस २०% अल्पसंख्याक ५० % व्यवस्थापन ५ % कोटा असेल.उपरोक्त कोटया अंतर्गत पात्र असणा-या व प्रवेश घेवू इच्छिणा-या विदयार्थ्यांनी खालील कार्यपदधतीचा अवलंब करावा.

**कोटया अंतर्गत प्रवेशासाठी पात्रतेचे निकष –**

१. **इनहाऊस कोटा** - ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेकरिता निश्चित केलेल्या क्षेत्रात एकाच संस्थेची माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक विदयालय/कनिष्ठ महाविदयालय असल्यास सदर माध्यमिक शाळेचा विदयार्थी इनहाऊस कोटयात प्रवेशासाठी पात्र राहील. सदर २०% इनहाऊस कोटयातील प्रवेश हे गुणवत्तेनुसार होतील.

२. **अल्पसंख्याक कोटा** - संबंधित कनिष्ठ महाविदयालयात अल्पसंख्याक कोटा हा धार्मिक तसेच भाषिक अल्पसंख्याकांसाठी ५० % जागा आरक्षित आहे.कनिष्ठ महाविदयालयाला ज्या प्रकारच्या अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र प्राप्त असेल त्या प्रमाणपत्रातील नोंदीनुसार संबंधित विदयार्थी त्या कोटयातील प्रवेशासाठी पात्र असतील.त्यासाठी विदयार्थ्याच्या शाळा सोडल्याच्या दाखलयामध्ये धार्मिक/भाषिक

अल्पसंख्याक बाबतच्या नोंदी असणे आवश्यक आहे. अल्पसंख्याक कोटयातील प्रवेश हे गुणवत्तेनुसार होतील.

३. व्यवस्थापन कोटा - सदर कोटा सर्व कनिष्ठ महाविदयालयासाठी (५%) असेल या कोटया अंतर्गत प्रवेशासाठी कोणताही विदयार्थी पात्र असेल व्यवस्थापन कोटयातील प्रवेश कनिष्ठ महाविदयालय व्यवस्थापन स्तरावर होतील.

उपरोक्त ३ प्रकारच्या कोटया अंतर्गत प्रवेश घेण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपदधती निश्चित करण्यात आली आहे .

**अ) कोटयांतर्गत प्रवेश घेणा-या विदयार्थ्यासाठी कार्यपदधती –**

१. **pune.fyjc.org.in** या वेबसाईटवर होमपेजवर नमुना प्रवेश अर्ज उपलब्ध करुन देण्यात आला आहे.सदर अर्ज विद्यार्थ्याने डाऊनलोड करुन त्याची प्रिंट घ्यावी.

२. सदर अर्जातील तपशीलाप्रमाणे संपूर्ण माहिती भरावी.

३. सदर कोटयातील प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश अर्जाचा भाग १ व भाग २ भरुन सबमिट करुन त्याची प्रिंट घेणे बंधनकारक आहे.

४. कोटया अंतर्गत प्रवेशाच्या अर्जासोबत ऑनलाईन केंद्रीय प्रवेश अर्ज भाग १ व भाग २ ची प्रिंट जोडणे आवश्यक आहे. तसेच अर्जात नमूद केल्याप्रमाणे इतर कागदपत्रे ही सोबत जोडावीत.

५. विद्यार्थ्यांनी कोटया अंतर्गत प्रवेशाच्या वेळापत्रकाची नोंद घ्यावी व दिलेल्या मुदतींत प्रवेश घ्यावा अन्यथा त्याचा प्रवेशावर हक्क राहणार नाही.

**ब ) कनिष्ठ महाविदयालयांसाठी कार्यपदधती**

१. कनिष्ठ महाविदयालयांनी उपरोक्त कोटयातील प्रवेशासाठी कोणत्याही प्रकरचा स्वतंत्र प्रवेश अर्ज विकसित अथवा विक्री करु नये.

२. सदर प्रवेश प्रक्रिया अर्ज व प्रक्रिया राबविण्यासाठी कोणतेही शुल्क घेवू नये.

३. विदयार्थी, कोटयातील प्रवेशासाठी अर्ज वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन भरुन देईल; अथवा कनिष्ठ महाविदयालयाने वेबसाईटवरुन अर्ज उपलब्ध करुन दयावा.

४. कनिष्ठ महाविदयालयाने शाखा ,माध्यम व कॉलेज कोडनिहाय कोटयातील प्रवेशाचे अर्ज स्विकारावेत .अर्ज स्विकारल्यावर विदयार्थ्यास पोहोच द्यावी व रजिस्टरमध्ये कॉलेज कोडनिहाय नोंद ठेवून अर्ज देणा-याची स्वाक्षरी घ्यावी. वेळापत्रकात दिलेल्या विहीत मुदतीतच अर्ज स्विकारावेत.

५. सर्व प्राप्त अर्जांची कोटानिहाय व कॉलेज कोडनिहाय सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करावी.सदर यादी सूचनाफलक व कनिष्ठ महाविदयालयाच्या वेबसाईटवर दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रसिध्द करावी.

६. पहिली गुणवत्ता यादी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे संबंधित कोटयाच्या क्षमतेइतकी प्रसिदध करावी.प्रत्येक कनिष्ठ महाविदयालयाने कोटया अंतर्गत गोषवारा विहीत नमून्यात तयार करुन पहिली गुणवत्ता यादी प्रसिध्द करताच **dydpune@gmail.com** येथे इ-मेल करावी.

७. वेळापत्रकाप्रमाणे **pune.fyjc.org.in** या वेबसाईटवर कॉलेज log-in मध्ये संबंधित कोटयामध्ये त्यांचा application numbers टाकून ॲडमिट करावेत विद्यार्थ्यास रु ५०/-शुल्क घेवून तात्पुरता प्रवेश द्यावा. व प्रवेशाची पावती द्यावी.

८. कोटयातील पहिल्या प्रवेश फेरीनंतर केंद्रीय प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहीर होईल.

९. केंद्रीय प्रवेशाच्या पहिल्या ऑनलाईन गुणवत्ता यादीत जर कोटयामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे नाव त्याला हव्या असणा-या महाविदयालयात आले असल्यास व सदर विदयार्थी ऑनलाईन केंद्रीय गुणवत्ता यादीतील महाविदयालयात प्रवेश घेण्यास इच्छुक असल्यास त्याने यापूर्वी कोटयातंर्गत घेतलेला तात्पुरता प्रवेश रदद करावा.संदरचा

प्रवेश तात्पुरत्या स्वरुपात रु ५०/- शुल्क भरुन घेता येईल तथापी त्याचा कोटयांतर्गत मिळालेला प्रवेश कायमस्वरुपी संपुष्टात येईल .

१०.कोटयाअंतर्गत प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी वेळापत्रका प्रमाणे जाहीर करताना पहिल्या गुणवत्ता यादीतील प्रवेश रदद झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागा लक्षात घेऊन उर्वरीत कोटयाअंतर्गत प्रवेशाच्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना गुणवत्ता क्रमाने प्रवेश द्यावेत.

११.याप्रमाणेच कोटयाअंतर्गत तिसरी फेरी वेळापत्रकाप्रमाणे होईल.

१२.उपरोक्त तीन फे-या पूर्ण झाल्यांनतर कोटयांतर्गत प्रवेशाच्या रिक्त जागा केंद्रीय प्रवेशाच्या तिस-या गुणवत्तायादीसाठी आपोआप समर्पित होतील.

**महत्वाची सूचना** :- १) कोटयांतर्गत केलेले प्रवेश **pune.fyjc.org.in** या वेबसाईटवर कनिष्ठ महाविदयालयाच्या log-in मध्ये नियोजित वेळापत्रकाप्रमाणे ॲडमिट करणे तसेच विद्यार्थ्यांनी रदद केलेले प्रवेश सदर वेबसाईटवरच cancel करणे सर्व महाविदयालयांना बंधनकारक आहेत. सदर वेबसाईटवर अपडेट झालेले प्रवेशच ग्राहय धरण्यात येतील याची संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

२. कोटयांतर्गत प्रवेश इ.११ वी चे प्रवेश प्रक्रियेत कनिष्ठ महाविदयालयांना दिलेल्या संकेतांकानुसार (college code no)अपडेट करावेत.

(रामचंद्र जाधव)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१